UPSC Fever



# Paper I
# प्रश्नपत्रिका I

**Time Allowed : 75 Minutes]** **[Maximum Marks : 100**

**Note :** (1) This Paper contains **Sixty (60)** multiple choice questions, each question carrying **Two (2)** marks.

(2) Attempt any **Fifty** (**50**) questions.

**सूचना :** (1) या प्रश्नपत्रिकेत **साठ (60)** बहुनिवड प्रश्न दिलेले असून प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत.

(2) कोणत्याही **पन्नास** (**50**) प्रश्नांची उत्तरे लिहा.

---

1. The least important teacher characteristic for effective teaching in primary education is :
   (A) Effective communication skill
   (B) Empathy for students
   (C) Impartial attitude towards students
   (D) High academic achievement

2. Which of the following statements is *true* ?
   (A) Motivated learners learn better than unmotivated
   (B) Girls learn better than boys
   (C) Children learn better than adults
   (D) Creative persons learn better than intelligent

3. Which of the following guarantees better retention ?
   (A) Use of visual aids by teacher
   (B) Active participation of the students
   (C) Use of relevant examples
   (D) Meaningful learning experiences

1. परिणामकारक अध्यापनासाठी सर्वात कमी महत्त्वाचे शिक्षक-गुणवैशिष्ट्य आहे :
   (A) परिणामकारक संप्रेषण कौशल्य
   (B) विद्यार्थ्यांप्रती सहानुभाव
   (C) विद्यार्थ्यांप्रती समभावात्मक अभिवृत्ती
   (D) उच्च शैक्षणिक संपादन

2. खालीलपैकी कोणते विधान **सत्य** आहे ?
   (A) प्रेरित नसणाऱ्यांपेक्षा प्रेरित अध्ययनकर्ते अधिक चांगले शिकतात
   (B) मुलांपेक्षा मुली अधिक चांगल्या शिकतात
   (C) प्रौढांपेक्षा बालक अधिक चांगले शिकतात
   (D) बुद्धिमान व्यक्तींपेक्षा सर्जनशील व्यक्ती अधिक चांगले शिकतात

3. चांगल्या धारणेची खात्री खालीलपैकी कशामुळे देता येते ?
   (A) शिक्षकाचा दृक्-साधनांचा वापर
   (B) विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग
   (C) सुसंबद्ध उदाहरणांचा वापर
   (D) अर्थपूर्ण अध्ययन अनुभूती

UPSC Fever



4. What is the current thinking on learning ?
   (A) Learner's mind is an empty vessel and teacher fills it with knowledge
   (B) Every learner builds concepts based on his previous knowledge
   (C) Learner eagerly absorbs information given by the teacher
   (D) Learning is a spontaneous response given to the stimulus of teaching

5. Computer can help enhance creative thinking when :
   (A) Students are asked to view effective powerpoint presentations
   (B) Students are asked to collect latest information through Internet
   (C) Students are asked to solve open-ended problems using a computer
   (D) Students are asked to prepare a research report using computer

4. अध्ययनाबाबत सध्याचा विचार कोणता ?
   (A) अध्ययनकर्त्याचे मन हे रिकामे भांडे आहे व शिक्षक त्यात ज्ञान भरतो
   (B) प्रत्येक अध्ययनकर्ता त्याच्या पूर्वज्ञानाच्या आधारे संकल्पना तयार करतो
   (C) अध्ययनकर्ता शिक्षकांनी दिलेली माहिती उत्सुकतेने ग्रहण करतो
   (D) अध्यापनचेतकाला दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद म्हणजे अध्ययन

5. सर्जनशील विचार वृद्धिंगत करण्यासाठी संगणक उपयुक्त ठरतो, जेव्हा :
   (A) विद्यार्थ्यांना प्रभावी पॉवरपॉईंट सादरीकरण पाहण्यास सांगितले जाते
   (B) विद्यार्थ्यांना इंटरनेटद्वारा अद्ययावत माहिती संग्रहित करण्यास सांगितले जाते
   (C) विद्यार्थ्यांना मुक्त समस्यांच्या निराकरणात संगणक वापरण्यास सांगितले जाते
   (D) विद्यार्थ्यांना संगणकाचा वापर करून संशोधन अहवाल तयार करण्यास सांगितले जाते

UPSC Fever



6. What is the main purpose of inclusion of projects, practicals and seminars by students ?
   (A) To increase active participation of the students
   (B) To evaluate non-academic qualities of the students
   (C) To make evaluation continuous and comprehensive
   (D) To develop self-study skills in students
7. Research refers to :
   (A) Routine activity
   (B) Annual activity
   (C) Occasional activity
   (D) Fact finding activity
8. A research problem is one which clearly seeks a relation between :
   (A) Logistics
   (B) Researchers
   (C) Hypothesis
   (D) Variables
9. The scientific approach has one characteristic that no other method of attaining knowledge has and that is :
   (A) Divine authority
   (B) Self-correction
   (C) Mystical prophecy
   (D) Spiritual Revelation
10. The process of establishing a relationship of mutual trust between the researcher and the participants is known as :
   (A) Intimacy
   (B) Informality
   (C) Rapport
   (D) Nexus

6. प्रकल्प, प्रात्यक्षिके आणि विद्यार्थ्यांची सादरीकरणे यांचा समावेश करण्याचा प्रमुख उद्देश कोणता ?
   (A) विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग वाढविणे
   (B) विद्यार्थ्यांच्या अशैक्षणिक (non-academic) गुणवैशिष्ट्यांचे मूल्यमापन करणे
   (C) मूल्यमापन सातत्यपूर्ण व सर्वंकष करणे
   (D) विद्यार्थ्यांत स्व-अध्ययन कौशल्ये विकसित करणे
7. संशोधन म्हणजे :
   (A) नेहमीची क्रिया
   (B) वार्षिक क्रिया
   (C) नैमित्तिक क्रिया
   (D) सत्यशोधन क्रिया
8. संशोधनात्मक प्रश्न कशामधील संबंध स्पष्टपणे शोधण्याचा प्रयत्न करतो ?
   (A) सेवापुरवठा (लॉजिस्टिक्स)
   (B) संशोधक
   (C) परिकल्पना
   (D) परिवर्त्य (व्हेरिएबल्स)
9. ज्ञान मिळवण्याच्या पद्धतींमधे इतर कोणत्याही पद्धतीत न दिसणारा पण शास्त्रीय पद्धतीत असणारा विशेष गुणधर्म म्हणजे :
   (A) दैवी अधिकार
   (B) स्वयं-सुधारणा
   (C) गूढ भविष्यवाणी
   (D) अध्यात्मिक प्रकटीकरण
10. संशोधक आणि संशोधनात सहभागी होणारे यांमध्ये परस्पर विश्वास निर्माण करण्याची प्रक्रिया म्हणजे :
   (A) जवळीक
   (B) अनौपचारिकता
   (C) एकतानता
   (D) संबंध

UPSC Fever



11. Hypothesis is formulated on the basis of :
    (A) Existing theory and literature
    (B) Interviews
    (C) Questionnaires
    (D) Observations
12. A village leader, or a manager of an organisation or the director of a hospital whose permission is sought and who suggests which members would be the best informants for the study, is the :
    (A) Key informant
    (B) Resource person
    (C) Gatekeeper
    (D) Critical participant

**Answer questions 13 to 18 based on *either* the English passage *or* the Marathi passage :**

If we ask where the tempestuous developments of world industry during the last quarter century have taken us, the answer is somewhat discouraging. Everywhere the problems seem to be growing faster than the solutions. This seems to apply to the rich countries just as much as to the poor. There is nothing in the experience of the last twenty-five years to suggest that modern technology, as we know it, can really help us to alleviate world poverty, not to mention the problem of unemployment which already

11. परिकल्पना (हायपॉथिसिस) तयार करण्यासाठीची पूर्वपीठिका यात असते :
    (A) उपलब्ध साहित्य आणि सिद्धांत
    (B) मुलाखती
    (C) प्रश्नावल्या
    (D) निरीक्षणे
12. गावातला पुढारी किंवा एखाद्या संस्थेचा व्यवस्थापक किंवा एखाद्या हॉस्पिटलचा संचालक की ज्याची परवानगी घ्यावी लागते किंवा चांगल्या प्रकारे कोण माहिती देईल हे सांगू शकणारी व्यक्ती म्हणजे :
    (A) की इन्फॉर्मंट
    (B) रिसोर्स पर्सन
    (C) गेटकीपर
    (D) क्रिटिकल पार्टिसिपंट

**प्रश्न क्र. 13 ते 18 हे पुढे दिलेल्या उताऱ्यावर आधारित आहेत. इंग्रजीतील *किंवा* मराठीतील उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे द्या :**

विज्ञानाचा उगम माणसाच्या जीवनसंघर्षातून झाला हे उघड आहे; तरी पण सत्य-संशोधन आणि सुखद जीवन या दोन्ही प्रेरणा प्रथमपासून विज्ञानाच्या प्रगतीला कारणीभूत झाल्या. निसर्ग आणि भोवतालची परिस्थिती यांचे अधिकाधिक ज्ञान संशोधनाने मिळवण्याचा माणसाचा प्रयत्न हे त्याच्या प्राथमिक विज्ञानाचे स्वरूप होते. असे संशोधन करता येण्यासाठी लागणारी विशिष्ट बुद्धी, कुशलता ज्यांच्याजवळ होती ते शास्त्रज्ञ म्हणून गणले गेले. विज्ञानामुळे समाज प्रगत होत गेला आणि प्रगत समाजात विज्ञानाची प्रगती होत गेली. म्हणूनच विज्ञानाच्या इतिहासाचे विहंगमावलोकन केले, तर साधारण तीन स्थूल

UPSC Fever



reaches levels like thirty per cent in many so-called developing countries, and now threatens to become endemic also in many of the rich countries. In any case, the apparent yet illusory successes of the last twenty-five years cannot be repeated.

So we had better face the question of technology–what does it do and what should it do ? Can we develop a technology which really helps us to solve our problems–a technology with a human face ?

The primary task of technology—it would seem, is to lighten the burden of work man has to carry in order to stay alive and develop his potential. It is easy enough to see that technology fulfils this purpose when we watch any particular piece of machinery at work—a computer, for instance, can do in seconds what it would take clerks or even mathematicians a very long time, if they can do it at all. It is more difficult to convince oneself of the truth of this simple proposition when one looks at whole societies. When I first began to travel the world, visiting rich and poor countries alike, I was tempted to formulate the first law of economics as follows.

अवस्थांतून त्याची प्रगती झाल्याची दिसते. (1) पौर्वात्य संस्कृतीतील विज्ञान, (2) पाश्चिमात्य विज्ञान आणि (3) जागतिक विज्ञान. जेथे जेथे संस्कृतीचा विकास झाला तेथे तेथे विज्ञानाची प्रगती झाली. (येथे कारण हे परिणाम आणि परिणाम हे कारण ठरते.) विज्ञान पाश्चिमात्यांची निर्मिती आहे हा समज पौर्वात्यांच्या अज्ञानाचा आणि त्याहीपेक्षा न्यूनगंडाचा परिपाक आहे. पूर्वेकडील अतिप्राचीन संस्कृतीत शास्त्रांची किती प्रगती झाली होती हे पुरेसे स्पष्ट नाही. 1854-55 साली झालेल्या उत्खननातून सुमेरियनांच्या बॅबिलोनियन संस्कृतीवर प्रथमच प्रकाशझोत पडला. तेथे सापडलेल्या शिलालेखात उल्लेखिलेल्या वस्तूंमध्ये रथ, घड्याळ, कमानी, कायदासंग्रह इत्यादींचा समावेश आहे. सॅम्युएल क्रॅमर या पुरातत्त्वशास्त्रज्ञाच्या मते, सुमेरियन संस्कृतीतील निदान सत्तावीस 'ऐतिहासिकदृष्ट्या प्रथम' (Historical First) अशा गोष्टी उजेडात आल्या. सुमारे सहा हजारांपेक्षा अधिक वर्षांपूर्वी बॅबिलोनिया (नंतर मेसोपोटेमिया, आता इराक) मध्ये 50,000 ते 1,00,000 वस्तीची एरिडू (Eridu), उरुक (Uruk), उम्मा (Umma) इ. मोठाली वैभवशाली शहरे होती. अशी प्रगती आवश्यक त्या विज्ञानाशिवाय अशक्य होती. इजिप्तने तर आतापर्यंत काळावर मात करणाऱ्या पिरॅमिड्सचा चमत्कार घडवला. भारत आणि चीनमधील संस्कृतींनी त्याबाबत चार पावले पुढेच टाकली होती. कणाद ऋषी (इ.स. प्रारंभी) नी भारतीय अणुवादाची मांडणी केली. आर्यभट्ट यांनी

UPSC Fever



'The amount of real leisure a society enjoys tends to be in inverse proportion to the amount of labour-saving machinery it employs.' If you go from easy-going England to, say, Germany or the United States, you find that people there live under much more strain than here. And if you move to a country like Burma, which is very near to the bottom of the league table of industrial progress, you find that people have an enormous amount of leisure really to enjoy themselves. Of course, as there is so much less labour saving machinery to help them they 'accomplish' much less than we do; but that is a different point. The fact remains that the burden of living rests much more lightly on their shoulders than on ours.

13. Which of the following statements is *true* ?
    (A) Technology promises more leisure
    (B) Technology can solve the problem of poverty
    (C) In spite of industrial and technological developments there are more problems than solutions
    (D) The problem of unemployment exists only in developing countries

इ.स. 500 च्या सुमारास $\pi$(पाय) चे मूल्य 3·1416 आणि सौरवर्षाचा काळ 365·58 दिवस म्हणून ठरवले. पृथ्वी सूर्याभोवती फिरते, ती गोलाकार आहे या गोष्टी आर्यभट्ट यांना ज्ञात होत्या. चीनमधील पंडितजन विज्ञानक्षेत्रात फार प्राचीन काळापासून जागरूक होते. कागद आणि छपाई या चीनच्या जगाला अतिशय मोलाच्या देणग्या आहेत. अरबांनी खगोलशास्त्र आणि गणित यांमध्ये प्रावीण्य प्रकट केले. अल-ख्वारीझमी (Al-Khvarigmi, साधारण इ.स. 850) या अरब शास्त्रज्ञाने लिहिलेल्या अल्-जब्र (Al-Jabr) ला 'अलजिब्रा' या गणितशास्त्रातील विभागाची पहिली संहिता मानण्यात येते. सारांश, आपापल्या काळाच्या मर्यादेत पौर्वात्य संस्कृती विज्ञान विषयात प्रगत होत्या. अर्थात शेवटी ज्ञान-विज्ञानाचे धन कोठल्या देशाचे वा खंडाचे असत नाही. ते असते मानवाचे, मानवासाठी.

13. मानवाची जिज्ञासाच विज्ञानाला चालना देणारी ठरली, त्याच्या जीवनात आलेली सुखावहता हा नंतरचा दुय्यम परिणाम होय :
    (A) पूर्ण विधान चूक
    (B) पूर्ण विधान बरोबर
    (C) पूर्वार्ध बरोबर
    (D) उत्तरार्ध बरोबर

UPSC Fever



14. The primary task of technology is to :
    - (A) create equality in society
    - (B) develop man's interest in work
    - (C) improve man's mental powers
    - (D) reduce the burden of man's work

15. According to the first law of economics formulated by the author, the amount of leisure enjoyed by the society is greater if :
    - (A) it uses more labour-saving machinery
    - (B) it uses less labour-saving machinery
    - (C) it controls the growth of labour-saving machinery
    - (D) it invents more labour-saving machinery

16. Which of the following statements is *not* true ?
    - (A) People in Burma enjoy more leisure than those in England
    - (B) People in Burma enjoy less leisure than those in the United States
    - (C) There is not much difference between the amount of leisure enjoyed by people in Germany and the United States
    - (D) People in England enjoy more leisure than those in Germany

14. पाश्चिमात्यांनीच विज्ञान निर्माण केले, ही समजूत होण्यास लेखकाच्या मते पुढीलपैकी कोणते कारण **नाही** ?
    - (A) पौर्वात्यांचा न्यूनगंड
    - (B) पौर्वात्यांचे स्वतःच्या इतिहासाबद्दलचे अज्ञान
    - (C) अतिप्राचीन पुराव्यांचा अभाव
    - (D) पाश्चिमात्यांकडील ऐतिहासिक पुरावे

15. विज्ञानाचा विकास व संस्कृतीचा विकास या दोन्ही गोष्टी परस्परावलंबी आहेत; तसेच परस्पर प्रेरकही आहेत.
    - (A) पूर्ण विधान चूक
    - (B) पूर्ण विधान बरोबर
    - (C) पूर्वार्ध बरोबर
    - (D) उत्तरार्ध बरोबर

16. बॅबिलोनियन संस्कृती पुढीलपैकी कोणत्या बाबतीत प्रगत होती असा पुरावा **नाही** ?
    - (A) वास्तुरचना
    - (B) तत्त्वज्ञान
    - (C) प्रशासन
    - (D) कालमापन

UPSC Fever



17. There is a significant difference between what technology does and what ?
    (A) it should have done
    (B) it does not
    (C) it could do
    (D) it should do
18. Choose the most appropriate title for the passage from the following :
    (A) The advantages of technology
    (B) Technology and unemployment
    (C) Technology and society
    (D) Technology in developed nations
19. As we move from interpersonal to mass communication :
    (A) messages become less structured and feedback becomes more instantaneous
    (B) messages become less structured and feedback becomes less instantaneous
    (C) messages become more structured and feedback becomes more instantaneous
    (D) messages become more structured and feedback becomes less instantaneous
20. Identify the *incorrect* statement from the following :
    (A) It is not that you cannot communicate
    (B) Silence communicates
    (C) Noise in channel affects message reception
    (D) Message is independent of characteristics of medium

17. ज्ञान–विज्ञानाचे धन सर्व मानवजातीचे असते, असे म्हणण्याचे कारण :
    (A) काही काळाने ते सर्व लोकांपर्यंत पोहोचते
    (B) संपर्कसाधने वाढल्यावर ते मर्यादित ठेवता येत नाही
    (C) त्यावर व्यक्तीला स्वामित्वहक्क सांगता येत नाही
    (D) शेवटी ते मानवी बुद्धीने मिळविलेले ज्ञान असते
18. पुढीलपैकी कोणते शीर्षक उताऱ्यास सर्वात समर्पक ठरेल ?
    (A) विज्ञानाचा उगम
    (B) पौर्वात्य व पाश्चिमात्य विज्ञान
    (C) विज्ञानाची वाटचाल
    (D) विज्ञान व जीवन
19. दोन व्यक्तींमधील संज्ञापनापासून जनसंज्ञापनापर्यंतच्या संज्ञापन प्रवासामध्ये :
    (A) संदेश कमी रचनाबद्ध होत जातात आणि प्रतिसाद तात्काळ मिळत जातात
    (B) संदेश कमी रचनाबद्ध होत जातात आणि प्रतिसादांची तात्कालिकता कमी होत जाते
    (C) संदेश अधिक रचनाबद्ध होत जातात आणि प्रतिसाद ही तात्काळ मिळत जातात
    (D) संदेश अधिक रचनाबद्ध होत जातात आणि प्रतिसादांची तात्कालिकता कमी होत जाते
20. खालीलपैकी **असत्य** विधान ओळखा :
    (A) तुम्ही संज्ञापन करु शकत नाही असे होत नाही
    (B) मौनातूनही संज्ञापन होते
    (C) माध्यमातील अडथळ्यांमुळे संदेशग्रहणावर परिणाम होतो
    (D) संदेश हा माध्यम वैशिष्ट्यांच्या निरपेक्ष असतो

UPSC Fever



21. Which of the following statements correctly describes the relationship between communication and culture ?
    (A) Culture is independent of communication
    (B) Communication is independent of culture
    (C) Communication and culture are dependent on each other
    (D) Culture and communication are unrelated entities

22. Which of the following is/are example/s of verbal communication ?
    (*i*) Writing
    (*ii*) Listening
    (*iii*) Reading
    (*iv*) Speaking
    (A) Only (*i*) and (*iv*) are correct
    (B) Only (*i*), (*iii*) and (*iv*) are correct
    (C) Only (*iii*) and (*iv*) are correct
    (D) All the four are correct

23. Arrange the following new media facilities chronologically :
    (*i*) twitter
    (*ii*) hotmail
    (*iii*) U-tube
    (*iv*) facebook
    (A) (*ii*), (*i*), (*iii*), (*iv*)
    (B) (*ii*), (*i*), (*iv*), (*iii*)
    (C) (*ii*), (*iv*), (*iii*), (*i*)
    (D) (*ii*), (*iii*), (*iv*), (*i*)

21. खालीलपैकी कोणते विधान संज्ञापन आणि संस्कृतीमधील नात्याचे अचूक वर्णन करते ?
    (A) संस्कृती संज्ञापनावर अवलंबून नसते
    (B) संज्ञापन संस्कृतीवर अवलंबून नसते
    (C) संज्ञापन आणि संस्कृती एकमेकांवर अवलंबून असतात
    (D) संज्ञापन आणि संस्कृती या घटकांचा एकमेकांशी संबंध नाही

22. खालीलपैकी काय सशब्द संज्ञापनाचे/ची उदाहरण/उदाहरणे आहे/आहेत ?
    (*i*) लिहिणे
    (*ii*) ऐकणे
    (*iii*) वाचणे
    (*iv*) बोलणे
    (A) फक्त (*i*) आणि (*iv*) उदाहरणे आहेत
    (B) फक्त (*i*), (*iii*) आणि (*iv*) उदाहरणे आहेत
    (C) फक्त (*iii*) आणि (*iv*) उदाहरणे आहेत
    (D) चारही गोष्टी उदाहरणे आहेत

23. नव्या माध्यमातील खालील संज्ञापन सुविधांची कालानुक्रमे संगती लावा :
    (*i*) ट्वीटर
    (*ii*) हॉटमेल
    (*iii*) U-ट्यूब
    (*iv*) फेसबुक
    (A) (*ii*), (*i*), (*iii*), (*iv*)
    (B) (*ii*), (*i*), (*iv*), (*iii*)
    (C) (*ii*), (*iv*), (*iii*), (*i*)
    (D) (*ii*), (*iii*), (*iv*), (*i*)

UPSC Fever



24. What is the motto of Doordarshan ?
    (A) Bahujan Hitay Bahujan Sukhay
    (B) Aharnish Sevamahe
    (C) Satyamev Jayate
    (D) Satyam Shivam Sundaram
25. Find the odd man out :
    (A) 165
    (B) 176
    (C) 243
    (D) 275
26. Replace the question mark (?) by an appropriate alternative in the following series :
    4 14/3 16/3 6 ?
    (A) 20/3
    (B) 22/3
    (C) 8
    (D) 9
27. Replace the question mark (?) by an appropriate alternative in the following letter series :
    B D G K ?
    (A) P
    (B) Q
    (C) O
    (D) N
28. In a specific code language, letters are coded as digits. Sequence of the digits may not be the same as that of letters. In this language, GOD is coded as 243, DAM is coded as 135, and OAT is coded as 721. How will you write the word DOT in this language ?
    (A) 731
    (B) 327
    (C) 325
    (D) 147

24. दूरदर्शनचे घोषवाक्य कोणते ?
    (A) बहुजन हिताय बहुजन सुखाय
    (B) अहर्निष सेवामहे
    (C) सत्यमेव जयते
    (D) सत्यम शिवम सुंदरम
25. विसंगत घटक ओळखा :
    (A) 165
    (B) 176
    (C) 243
    (D) 275
26. पुढील क्रमिकेमध्ये प्रश्नचिन्हाच्या ( ? ) जागी योग्य पर्याय निवडा :
    4 14/3 16/3 6 ?
    (A) 20/3
    (B) 22/3
    (C) 8
    (D) 9
27. पुढील अक्षर क्रमिकेत प्रश्नचिन्हाच्या ( ? ) जागी योग्य पर्याय निवडा :
    B D G K ?
    (A) P
    (B) Q
    (C) O
    (D) N
28. एका विशिष्ट सांकेतिक भाषेत, अक्षरांचे संकेतन अंकांनी केले जाते. अंकांचा क्रम हा अक्षरांच्या क्रमानुसारच असेल असे नाही. या भाषेत GOD चे संकेतन 243, DAM चे संकेतन 135 आणि OAT चे संकेतन 721 असे आहे. या भाषेत DOT हा शब्द कसा लिहाल ?
    (A) 731
    (B) 327
    (C) 325
    (D) 147

UPSC Fever



29. Select the number that is different from the rest of the numbers :
(A) 2105
(B) 3217
(C) 5255
(D) 9879

30. There are three men in a family. If two of them are sons and two of them are fathers, how is the youngest related to the eldest ?
(A) Grandfather
(B) Grandson
(C) Son
(D) Father

31. In this question, a statement is followed by two assumptions, I and II. Decide which of the assumption/s is/are implicit in the given statement. Indicate your answer by choosing one of the alternatives :
**Options** :
(A) if assumption I only is implicit
(B) if assumption II only is implicit
(C) if both I and II are implicit
(D) if neither I nor II is implicit
**Statement :** The present system of examination needs planned change.
**Assumptions :**
I : The present examination system is obsolete.
II : Planned change leads to improvement.

29. पुढीलपैकी कोणती संख्या इतर संख्यांपेक्षा वेगळी आहे ?
(A) 2105
(B) 3217
(C) 5255
(D) 9879

30. एका कुटुंबात तीन पुरुष आहेत. त्यात दोन मुलगे व दोन वडील असतील तर त्यांमधील सर्वात लहान पुरुष सर्वात वडील पुरुषाचा कोण ?
(A) आजोबा
(B) नातू
(C) मुलगा
(D) वडील

31. या प्रश्नात एक विधान व त्याखाली दोन गृहितके I व II दिलेली आहेत. दिलेल्या विधानामध्ये कोणते/कोणती गृहितक/गृहितके अनुस्यूत आहे/त हे ठरवा. तुमचे उत्तर योग्य त्या पर्यायाद्वारे दर्शवा.
**पर्याय** :
(A) गृहितक I अनुस्यूत आहे.
(B) गृहितक II अनुस्यूत आहे.
(C) दोन्ही गृहितके, I व II, अनुस्यूत आहेत.
(D) दोन्हींपैकी कोणतेच गृहितक अनुस्यूत नाही.
**विधान :** सध्याच्या परीक्षापद्धतीत योजनाबद्ध बदल आवश्यक आहेत.
**गृहितके** :
I : सध्याची परीक्षा पद्धती कालबाह्य आहे.
II : योजनाबद्ध बदलांमुळे सुधारणा होते.

UPSC Fever



32. In this question, two statements numbered 1 and 2 are followed by two conclusions P and Q. You have to take the two statements to be true and then decide which of the two conclusion/s necessarily follow/s from the two given statements. Indicate your answer by using the appropriate alternatives.

**Options :**

(A) if only conclusion P follows
(B) if only conclusion Q follows
(C) if both conclusions P and Q follow
(D) if neither conclusion P nor Q follows

**Statements :**

(1) All clerks are modern.
(2) Some men are clerks.

**Conclusions :**

(P) : All modern persons are men.
(Q) : Some men are modern

33. Fill in the blank with an appropriate alternative :

Beta : Alpha : : Act one : –

(A) Act two
(B) Overture
(C) Finale
(D) Intermission

34. Which one of the following pairs of words is different from the others ?

(A) Bread : Butter
(B) Drink : Tea
(C) Liquid : Water
(D) Cold drink : Pepsi

32. या प्रश्नात दोन विधाने 1 आणि 2 दिलेले आहेत; त्यानंतर P आणि Q हे दोन निष्कर्ष आहेत. तुम्हाला दोन्ही विधाने खरी मानावयाची आहेत. आणि त्यांपासून कोणता/कोणते निष्कर्ष निश्चितपणे काढता येतील ते ठरवायचे आहेत. तुमचे उत्तर पुढीलपैकी एका पर्यायाद्वारे दर्शवायचे आहे.

**पर्याय :**

(A) फक्त P हा निष्कर्ष निघतो.
(B) फक्त Q हा निष्कर्ष निघतो.
(C) P आणि Q हे दोन्ही निष्कर्ष निघतात.
(D) P आणि Q यांपैकी कोणताच निष्कर्ष निघत नाही

**विधाने :**

(1) सर्व लिपिक आधुनिक आहेत.
(2) काही पुरुष लिपिक आहेत.

**निष्कर्ष :**

(P) : सर्व आधुनिक व्यक्ती पुरुष आहेत.
(Q) : काही पुरुष आधुनिक आहेत.

33. योग्य पर्याय वापरून रिकामी जागा भरा :

बीटा : अल्फा : : प्रथम अंक : –

(A) द्वितीय अंक
(B) नांदी
(C) अंतिम अंक
(D) मध्यंतर

34. पुढीलपैकी कोणती शब्दजोडी इतर जोड्यांपासून वेगळी आहे ?

(A) ब्रेड : लोणी
(B) पेय : चहा
(C) द्रव : पाणी
(D) शीतपेय : पेप्सी

UPSC Fever



35. In a picnic of elderly persons, 25 persons take tea, 20 persons take coffee and 15 persons take milk. Ten persons take both tea and coffee and 8 persons take both milk and coffee. None of them takes tea and milk both and everyone takes at least one of the three beverages. How many persons went to the picnic ?
(A) 25
(B) 35
(C) 42
(D) 60

36. '4 + 44 + 444 + 4444 + .........' This series has nine terms. If we add these, which number will be in ten's place ?
(A) 2
(B) 3
(C) 5
(D) 8

The following table shows unit sales of TT950 motorcycles in six European countries over a six month period. Use this information to answer questions **37** to **42**.

| | Months | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Country | Jan. | Feb. | March | Apr. | May | June | Total |
| Germany | 34 | 47 | 45 | 54 | 56 | 60 | 296 |
| U.K. | 40 | 44 | 36 | 47 | 47 | 46 | 260 |
| France | 37 | 32 | 32 | 32 | 34 | 33 | 200 |
| Belgium | 14 | 14 | 14 | 16 | 17 | 14 | 89 |
| Spain | 29 | 29 | 28 | 31 | 29 | 31 | 177 |
| Italy | 22 | 24 | 24 | 26 | 25 | 23 | 144 |
| Total | 176 | 190 | 179 | 206 | 208 | 207 | 1166 |

35. वयस्क लोकांच्या एका सहलीत 25 लोक चहा पितात, 20 लोक कॉफी पितात आणि 15 लोक दूध पितात. दहा लोक चहा व दूध दोन्ही पितात, 8 लोक दूध व कॉफी दोन्ही पितात. चहा आणि दूध दोन्ही पिणारे कोणीच नाहीत आणि प्रत्येक व्यक्ती वरील तीन पेयांपैकी किमान एकाचे सेवन करते. सहलीला जाणाऱ्या लोकांची एकूण संख्या किती ?
(A) 25
(B) 35
(C) 42
(D) 60

36. '4 + 44 + 444 + 4444 + .......' या क्रमिकेत नऊ पदे आहेत. या सर्वांची बेरीज केल्यास येणाऱ्या संख्येच्या दशमस्थानी कोणता अंक असेल ?
(A) 2
(B) 3
(C) 5
(D) 8

खालील तक्त्यामध्ये TT950 मोटरसायकलच्या सहा युरोपियन देशांमध्ये सहा महिन्यांच्या कालावधीत झालेल्या विक्रीची माहिती दिली आहे. ही माहिती वाचून प्रश्न **37** ते **42** ची उत्तरे लिहा :

| | महिना | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| देश | जाने. | फेब्रु. | मार्च | एप्रिल | मे | जून | एकूण |
| जर्मनी | 34 | 47 | 45 | 54 | 56 | 60 | 296 |
| इंग्लंड | 40 | 44 | 36 | 47 | 47 | 46 | 260 |
| फ्रान्स | 37 | 32 | 32 | 32 | 34 | 33 | 200 |
| बेल्जियम | 14 | 14 | 14 | 16 | 17 | 14 | 89 |
| स्पेन | 29 | 29 | 28 | 31 | 29 | 31 | 177 |
| इटली | 22 | 24 | 24 | 26 | 25 | 23 | 144 |
| एकूण | 176 | 190 | 179 | 206 | 208 | 207 | 1166 |

UPSC Fever



37. What percentage of the overall total was sold in Germany ?
(A) 24.6
(B) 25.4
(C) 25.8
(D) 24.1

38. What percentage of the overall total was sold in May ?
(A) 25.6
(B) 24.1
(C) 20.3
(D) 17.9

39. Which month showed the biggest increase in total sales from the previous month ?
(A) February
(B) March
(C) April
(D) May

40. What percentage of the monthly total was sold in the country that had the maximum sales in February ?
(A) 24.7
(B) 23.1
(C) 36.5
(D) 15.1

41. What is the average number of units per month sold in Italy over the first four months ?
(A) 22
(B) 23
(C) 24
(D) 26

37. जर्मनीतील विक्री ही एकूण विक्रीच्या किती टक्के होती ?
(A) 24.6
(B) 25.4
(C) 25.8
(D) 24.1

38. एकूण विक्रीच्या किती टक्के विक्री मे महिन्यात झाली ?
(A) 25.6
(B) 24.1
(C) 20.3
(D) 17.9

39. कोणत्या महिन्यामध्ये आधीच्या महिन्यांच्या तुलनेत सर्वाधिक विक्री झाली ?
(A) फेब्रुवारी
(B) मार्च
(C) एप्रिल
(D) मे

40. फेब्रुवारी महिन्यात सर्वाधिक विक्री झालेल्या देशामधील विक्री मासिक एकूण विक्रीच्या किती टक्के होती ?
(A) 24.7
(B) 23.1
(C) 36.5
(D) 15.1

41. इटलीमध्ये पहिल्या चार महिन्यात झालेल्या विक्रीची मासिक सरासरी किती आहे ?
(A) 22
(B) 23
(C) 24
(D) 26

UPSC Fever



42. What percentage of total sales is accounted for by the three smallest importers ?
(A) 37.1
(B) 40.0
(C) 36.6
(D) 35.1

43. .temp is a :
(A) transit file
(B) transitional file
(C) temporary file
(D) transfer file

44. ETH means :
(A) computers for higher education
(B) electronic technology for open education
(C) satellites for international education
(D) radio for school education

45. Twitter is generally used for :
(A) secret information sharing
(B) electronic mailing
(C) interpersonal communication
(D) social networking

46. In a virtual classroom :
(A) a teacher's physical presence is not needed
(B) a teacher's physical presence is neccessary
(C) a Principal's physical presence is necessary
(D) students' physical presence is not necessary

47. The process of communication is considered complete when :
(A) an idea becomes a message
(B) a message is transmitted
(C) a message is transmitted and received
(D) a message is transmitted, received and a feedback is sent

42. न्यूनतम विक्री असलेल्या तीन देशांमधील एकत्रित विक्री ही एकूण विक्रीच्या किती टक्के आहे ?
(A) 37.1
(B) 40.0
(C) 36.6
(D) 35.1

43. .temp ही
(A) ट्रान्झिट फाईल आहे
(B) ट्रांझिशनल फाईल आहे
(C) टेंपररी फाईल आहे
(D) ट्रान्स्फर फाईल आहे

44. ETH म्हणजे :
(A) उच्च शिक्षणासाठी संगणकाचा वापर
(B) मुक्त शिक्षणासाठी इलेक्ट्रॉनिक तंत्रज्ञानाचा वापर
(C) आंतरराष्ट्रीय शिक्षणासाठी उपग्रहांचा वापर
(D) शालेय शिक्षणासाठी नभोवाणीचा वापर

45. ट्विटर चा वापर हा साधारणपणे यासाठी केला जातो :
(A) गुप्त माहितीचे आदानप्रदान
(B) इलेक्ट्रॉनिक मेल
(C) आंतरव्यक्ती संज्ञापन
(D) मोठ्या सामाजिक समुहाशी संज्ञापन

46. आभासी वर्गात :
(A) शिक्षकाने वर्गात प्रत्यक्ष हजर असणे आवश्यक नसते
(B) शिक्षकाने वर्गात प्रत्यक्ष हजर असणे आवश्यक असते
(C) प्राचार्यांचे वर्गात प्रत्यक्ष हजर असणे आवश्यक असते
(D) विद्यार्थ्यांचे वर्गात प्रत्यक्ष हजर असणे आवश्यक नसते

47. संज्ञापनाची प्रक्रिया पूर्ण झाली असे केव्हा समजले जाते ?
(A) जेव्हा विचाराचे संदेशात रूपांतर होते
(B) जेव्हा संदेशाचे वहन होते
(C) जेव्हा संदेशाचे वहन होते व तो स्वीकारला जातो
(D) जेव्हा संदेशाचे वहन होते, तो स्वीकारला जातो व त्यानुसार प्रत्याभरण होते

UPSC Fever



48. When you plan for a speech, the following elements will influence your presentation ?
(*i*) The participants
(*ii*) The setting
(*iii*) The purpose
(A) Only (*i*) is correct
(B) Only (*i*) and (*ii*) are correct
(C) Only (*i*) and (*iii*) are correct
(D) All three are correct

49. Geothermal energy is :
(A) energy derived from underground water
(B) energy derived from the heat of the Earth's crust
(C) energy from subsurface ocean currents
(D) energy from coal

50. This wild mammal became extinct from India around the mid-twentieth century :
(A) Gangetic dolphin
(B) Giant Panda
(C) Indian two-horned rhino
(D) Cheetah

51. Global warming is due mainly to :
(A) increase in carbon dioxide
(B) increase in oxygen
(C) decrease in nitrogen
(D) decrease in ozone

52. Barometer is used to measure :
(A) wind velocity
(B) body temperature
(C) blood pressure
(D) atmospheric pressure

48. सादरीकरणाच्या नियोजनावर पुढील घटकांचा प्रभाव पडू शकतो :
(*i*) सहभागी व्यक्ती
(*ii*) परिस्थिती
(*iii*) उद्देश
(A) केवळ (*i*) बरोबर आहे
(B) केवळ (*i*) व (*ii*) बरोबर आहेत
(C) केवळ (*i*) व (*iii*) बरोबर आहेत
(D) वरील सर्व बरोबर आहेत

49. भूऔष्णिक ऊर्जा म्हणजे :
(A) भूजलापासून निर्मित ऊर्जा
(B) पृथ्वीच्या कवचातील उष्णतेपासून निर्मित ऊर्जा
(C) सागरपृष्ठाखालून वाहणाऱ्या सागरी प्रवाहांपासून मिळणारी ऊर्जा
(D) कोळशापासून मिळणारी ऊर्जा

50. हा वन्यप्राणी विसाव्या शतकाच्या मध्यात भारतातून नामशेष झाला :
(A) गंगेतील डॉल्फिन
(B) महाकाय पांडा
(C) दोन शिंगी भारतीय गेंडा
(D) चित्ता

51. जागतिक तापमान वृद्धी मुख्यत: कशामुळे होते ?
(A) कर्बद्विप्राणील वायूच्या प्रमाणात वाढ
(B) प्राणवायूच्या प्रमाणात वाढ
(C) नत्रवायूच्या प्रमाणात घट
(D) ओझोन वायूच्या प्रमाणात घट

52. बॅरोमीटर कशाचे मापन करण्यासाठी वापरतात ?
(A) वाऱ्याचा वेग
(B) शरीराचे तापमान
(C) रक्तदाब
(D) वातावरणीय दाब

UPSC Fever



53. GPS is a system that helps in locating positions with the help of :
(A) Microwaves
(B) Satellites
(C) Police intelligence
(D) Wireless communication

54. The proposed Posco Steel Plant is going to be located in :
(A) Jharkhand
(B) Chhattisgarh
(C) Odisha
(D) West Bengal

55. Which of the following is *not* a main function of university ?
(A) Teaching
(B) Research
(C) Publication
(D) Extension work

56. UGC has allowed students to do Diploma or Certificate Courses side by side with degrees to :
(A) Increase income of the Universities and colleges
(B) Provide sufficient workload to the teaching staff
(C) Utilize human and nonhuman resources maximum
(D) Empower students to take up work soon after their degree courses.

53. जी.पी.एस्. प्रणालीने स्थाननिश्चिती करण्यासाठी याचा उपयोग केला जातो :
(A) सूक्ष्मलहरी
(B) उपग्रह
(C) पॉलिसी गुप्तवार्ता
(D) बिनतारी संदेश

54. प्रस्तावित 'पॉस्को पोलाद प्रकल्प' कोणत्या राज्यात उभारला जाणार आहे ?
(A) झारखंड
(B) छत्तीसगढ
(C) ओडिशा
(D) पश्चिम बंगाल

55. खालीलपैकी कोणते विद्यापीठाचे प्रमुख कार्य **नाही** ?
(A) अध्यापन
(B) संशोधन
(C) प्रकाशन
(D) विस्तार कार्य

56. विद्यापीठ अनुदान आयोगाने विद्यार्थ्यांना पदवीबरोबरच पदविका किंवा प्रमाणपत्र अभ्यासक्रम करण्याची परवानगी देण्याचे कारण :
(A) विद्यापीठे व महाविद्यालयांचे उत्पन्न वाढविणे
(B) अध्यापकांना पुरेसा कार्यभार उपलब्ध करून देणे
(C) मानवी व अमानवी संसाधनांचा जास्तीत जास्त विनियोग करणे
(D) विद्यार्थ्यांना त्यांचे पदवी अभ्यासक्रम झाल्यावर काम करण्यास सक्षम बनविणे

UPSC Fever



57. Which of the following does *not* come under the Department of Higher Education, Government of India ?
(A) Indian Council of Social Science Research
(B) Indian Council of Philosophical Research
(C) Indian Council of World Affairs
(D) Indian Council of Historical Research

58. Freedom to attend religious instruction or religious worship in certain educational institutions in India is granted by :
(A) Fundamental Rights
(B) Fundamental Duties
(C) Directive Principles
(D) Human Rights

59. Highest academic decision making body of the University is :
(A) Board of Studies
(B) Faculty
(C) Academic Council
(D) BCUD

60. The main objectives of the Department of Higher Education of the Government of India are :
(*i*) Laying down the National Policy of Education
(*ii*) Bringing about planned development of Higher and Technical Education
(*iii*) Bringing about development of Indian Languages
(*iv*) Giving scholarships to deserving students
(A) Only (*i*) and (*ii*) are correct
(B) Only (*i*), (*ii*) and (*iii*) are correct
(C) Only (*i*) and (*iii*) are correct
(D) All the four are correct

57. भारत सरकारच्या उच्च शिक्षण विभागात खालीलपैकी कशाचा समावेश होत **नाही** ?
(A) इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च
(B) इंडियन कौन्सिल ऑफ फिलॉसॉफिकल रिसर्च
(C) इंडियन कौन्सिल ऑफ वर्ल्ड अफेअर्स
(D) इंडियन कौन्सिल ऑफ हिस्टॉरिकल रिसर्च

58. भारतात विशिष्ट शैक्षणिक संस्थांमध्ये धार्मिक शिक्षणाचे व पूजेचे स्वातंत्र्य यानुसार दिले जाते :
(A) मूलभूत हक्क
(B) मूलभूत कर्तव्ये
(C) मार्गदर्शक तत्त्वे
(D) मानवी हक्क

59. विद्यापीठाचे शैक्षणिक निर्णय घेणारे सर्वोच्च मंडळ..................आहे.
(A) अभ्यासमंडळ
(B) विद्याशाखा
(C) विद्यापरिषद
(D) महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

60. भारत सरकारच्या उच्च शिक्षण विभागाची मुख्य उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत :
(*i*) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ठरविणे
(*ii*) उच्च व तांत्रिक शिक्षणाचा नियोजनबद्ध विकास घडवून आणणे
(*iii*) भारतीय भाषांचा विकास घडवून आणणे
(*iv*) गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे
(A) फक्त (*i*) आणि (*ii*) बरोबर आहेत
(B) फक्त (*i*), (*ii*) आणि (*iii*) बरोबर आहेत
(C) फक्त (*i*) आणि (*iii*) बरोबर आहेत
(D) चारही बरोबर आहेत.

ROUGH WORK

ROUGH WORK

UPSC Fever



ROUGH WORK

UPSC Fever



ROUGH WORK

UPSC Fever

Test Booklet No.
प्रश्नपत्रिका क्र. **A**

Signature of Invigilators
1. ........................................
2. ........................................

# Paper I

Seat No. ☐☐☐☐☐☐
(In figures as in Admit Card)

Seat No. (In words) ............................
..............................................................

## NOV- 00011

Answer Sheet No. ☐☐☐☐☐

**Time Allowed : 75 Minutes]** **[Maximum Marks : 100**

Number of Pages in this Booklet : **24**

### Instructions for the Candidates

1. Write your roll number in the space on the top of this page.
2. This paper consists of **sixty** (**60**) multiple-choice type of questions, out of which the candidate would be required to answer any *fifty* (**50**) questions. In the event of the candidate attempting more than fifty questions, the first fifty questions attempted by the candidate would be evaluated.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to you. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as below :
   - (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal and do not accept an open booklet.
   - (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to pages/questions missing or duplicate or not in serial order or any other discrepancy should be got replaced immediately by a correct booklet from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given.**
   - (*iii*) After this verification is over, the Test Booklet Number should be entered in the OMR Sheet and the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each item has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the oval as indicated below on the correct response against each item.

   **Example :** (A) (B) ● (D)

   Where (C) is the correct response.
5. Your responses to the items for Paper I and Paper II are to be indicated in the **Answer Sheet given inside the Booklet, which is common for both the papers**. If you mark at any place other than in the ovals in the Answer Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done in the end of this booklet.
8. If you write your name or put any mark on any part of the Answer Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return the test question booklet and OMR Answer Sheet to the invigilators at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marks for incorrect answers.**

### परीक्षार्थींसाठी सूचना

1. या पानावरील वरच्या कोपऱ्यात आपला आसन क्रमांक लिहावा.
2. या प्रश्नपत्रिकेत **साठ** बहुनिवड प्रश्न आहेत, यापैकी परीक्षार्थ्यांना कोणतेही **पन्नास** प्रश्न सोडवायचे आहेत. जर परीक्षार्थ्याने पन्नासपेक्षा जास्त प्रश्न सोडविले तर त्यावेळेस त्याने सोडविलेले पहिले पन्नास प्रश्नच तपासले जाईल.
3. परीक्षेच्या वेळेस तुम्हाला प्रश्नपत्रिका देण्यात येईल. पहिल्या पाच मिनिटांमध्ये तुम्हाला प्रश्नपत्रिका खोलण्यास सांगण्यात येईल तेव्हा खालीलप्रमाणे निरीक्षण करा.
   - (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी तुम्हाला ह्या मुखपृष्ठावरील कागदी सील फाडायचे आहे. स्टीकर–सील शिवाय असलेली व खुली प्रश्नपत्रिका स्वीकारू नये.
   - (*ii*) **प्रश्नपत्रिकेतील पृष्ठांची संख्या व प्रश्नांची संख्या ही मुखपृष्ठावर दिलेल्या माहितीप्रमाणे बरोबर आहे याची खात्री करा. पृष्ठे किंवा प्रश्न गहाळ असेल किंवा पुनरावृत्ती किंवा योग्य क्रमाने नसणे यासारखे दोष प्रश्नपत्रिकेत आढळल्यास या पाच मिनिटांच्या अवधीत परीक्षकांकडून प्रश्नपत्रिका त्वरीत बदलून घ्यावी. त्यानंतर, प्रश्नपित्रका बदलून मिळणार नाही किंवा अतिरीक्त वेळ दिला जाणार नाही.**
   - (*iii*) सर्व पडताळणी झाल्यानंतर, प्रश्नपत्रिका क्रमांक OMR उत्तरपत्रिकेवर दिलेल्या रकान्यात लिहून त्याप्रमाणे काळा करावा आणि OMR उत्तरपत्रिकेचा क्रमांक या प्रश्नपत्रिकेवर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा करावा.

   **उदा.** (A) (B) ● (D)

   जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे उत्तरपत्रिकेमध्येच द्यावीत. **ह्या प्रश्नपत्रिकेसोबत दिलेली उत्तरपत्रिका पेपर I व पेपर II दोन्हींसाठी एकच राहील.** उत्तराच्या रकान्याशिवाय इतर ठिकाणी खुणा केलेले उत्तर ग्राह्य धरले जाणार नाही.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. कच्च्या कामासाठी प्रश्नपत्रिकेच्या शेवटी कोरे पान जोडले आहे.
8. उत्तरपत्रिकेवर दिलेल्या रकान्यात भरावयाच्या माहिती व्यतिरीक्त आपली ओळख पटविण्यासाठी उत्तरपत्रिकेवर अन्य कोठेही नाव किंवा इतर कोणतीही खूण केल्यास आपणास अपात्र ठरविण्यात येईल.
9. या पेपरची परीक्षा संपल्यानंतर प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका **दोन्ही** पर्यवेक्षकांना परत करावी. यातील कोणताही कागद तुमच्या बरोबर परीक्षा केंद्राबाहेर नेण्यास सक्त मनाई आहे.
10. **उत्तरे दर्शविण्यासाठी काळ्या/निळ्या बॉल पाईंट पेनचा उपयोग करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल, इत्यादी जवळ ठेवता व वापरता येणार नाहीत.**
12. **चुकीच्या उत्तरास गुण वजा केले जाणार नाहीत.**